# फळशास्त्र विभाग

## उद्यानविद्या विद्याशाखा

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

क्र.वि.प्र./फ. शा./प्र.अ. रोपवाटिका/ १८० /२०२३ दि. ०८/०६/२०२३

**दर पत्रक सुचना**

प्रती,

..........................................................

..........................................................

..........................................................

**विषय: रंगपूर व निंबू रोपांची लागवड (Transplanting of seedling) पॉलीबॅग मध्ये करणे बाबत.**

वरील विषयाच्या अनुषंगाने फळरोप वाटिका, फळशास्त्र विभगा मध्ये अं. एक ते दिड लाख रंगपूर/निंबू रोपांची रोपांची लागवड (Transplanting of seedling) बाह्यस्त्रोता मार्फत करार पद्धतिने करावयाची आहेत तरी, इच्छुक व सदर कामाचा अनुभाग असणाऱ्या ठेकेदारांनी कृपया सोबत दिलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून खालील विवरण करण्यात आलेल्या कामाचे दरपत्रक या कार्यालयास विहित मुदतीत सादर करावेत.

| अ. क्र. | कामाचे विवरण | सादर करावयाचा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | रंगपुर व निंबू रोपांची लागवड प्लास्टिक क्रेट्स व बेड मधून काढून उपलब्ध मातीने भरलेल्या ६" x ९" व ८" x १२" आकाराच्या पॉलीबॅग मध्ये लागवड करणे ई. | प्रति शेकडा रोपे या नुसार | या कामा करिता लागणारे सर्व साहित्य कंत्राटदारास पुरवठा करावा लागेल |

**टिप:** सर्व दर पत्रके दि. १५ /०६/२०२३ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयास सादर करावेत. सर्व दर पत्रके हे **निम्नस्वाक्षरी कर्ता** यांच्या नावे खलील पत्त्यावर विहित मुदतीच्या आत पोहचविण्याचे करावे.

विभाग प्रमुख .
फळशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

Scanned with CamScanner

## दर पत्रका विषयी नियम व अटी शर्ती

1. दर पत्रके बंद लिफाफ्या मध्ये सादर करावीत.
2. लीफापाच्या डाव्या बाजूस स्पष्ट अक्षरात **'रोपांची लागवड (Transplanting of seedling) पॉलीबॅग मध्ये करणे बाबतचे दर पत्रक'** असे नमूद करावे तसेच दर पत्रक मध्ये या कार्यालयाचा संदर्भ पत्रक क्र.वि.प्र./फ. शा./प्र.अ. रोपवाटिका/ 960 /२०२३ व दि. 06 /०६/२०२३ नमूद करावे.
3. देयक सादर करतांना, जी.एस.टी. संबधी शासन निर्णय जुलै २०१७ मधील नियम व अटी ची पूर्तता करण्याची जबाबदारी हि ठेकेदाराची स्वतःची असेल.
4. सदर कामाचे दर लागू असलेल्या जी.एस.टी. सह सादर करावेत. रु. २.५० लाखा पेक्षा अधिकच्या देयका मधुन एकूण रकमेच्या २ % जि.एस.टी. आणि १ % टी.डी.एस. कपात करण्यात येईल व याचा परतावा आय. टी. रिटर्न भरतांना केल्या जाईल तसेच कपातीचे प्रमाणपत्र या कार्यालया मार्फत देयक अदा करतांना पुरविण्यात येईल.
5. काम करणाऱ्या मजुरांचा सामुहिक विम्याची (Group Insurance) ई. ची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असेल व कुठल्याही प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती अथवा शारीरिक हानी उदा. वीज पडणे, साप चावणे, व शेतीस अनसरून ईतर ईजा ई. बाबत हे कार्यालय कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही/ स्वीकारणार नाही.
6. काम अपूर्ण अवस्थेत सोडून दिल्यास कामाचा मोबदला दिल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.
7. समान दरपत्रके व दर आठळून आल्यास या पूर्वी केलेल्या काम आणि संबंधित कामाचा अनुभव यांना प्राधान्य देण्यात येईल व या बाबतचे सर्व अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता यांचे असतील.
8. कोणतीही निविदा पूर्ण पणे अंशतःस्वीकारणे किंवा आलेल्या सर्व दर पत्रके नाकारणे याचे अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता तसेच गठीत समितीचे यांचे असतील.
9. काही तांत्रिक अथवा कार्यालयीन कारणास्तव देयेक अदा करण्यास उशीर झाल्यास संबंधित ठेकेदारास मजुरांचे देयक अदा करण्याची स्वतः जबाबदारी राहील.
10. दर पत्रके मंजूर करणे अथवा काम समाधानकारक नकेल्यास सदर करार रद्द करणे या बाबत चे सर्व हक्क समितीने स्वतः कडे राखून ठेवले आहेत.
11. कामा दरम्यान या प्रक्षेत्रावरील कलमे व इतर उत्पादने कोणत्याही सबबीवर बाहेर नेता येणार नाहीत तसे आढळ्यास कठोर कार्यवाही केल्या जाईल.
12. सदरचे काम ठराविक कालावधीत पूर्ण करणे अनिवार्य असेल.
13. या दरप्रक्रीये अथवा कामाच्या बाबतीत काही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास अकोला न्यायालयात चालेल.
14. संबंधित ठेकेदाराने वरील नियम व अटी शर्ती मान्य असल्या बाबतचेह दर पत्रक सही, नाव व पूर्ण पत्त्यासह या कार्यालास विहित मुदतीच्या आत सादर करावे.

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

Scanned with CamScanner